जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १२ दिनांक - ०७/०१/२०२५**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर

## दरोडयाच्या प्रयत्नातील फरार आरोपीस अटक, दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.९९६/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३१०(४),३१०(५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) १३५ व आर्म ॲक्ट कलम ४ सह २५ या गुन्हयातील पाहीजे आरोपी **यश दिपक घोडके,सध्याचे वय १८ वर्षे,रा.जैन मंदीर, सच्चाईमाता,आंबेगाव खु,पुणे** हा गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हता.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे त्याचा शोध घेत असतांना गुप्त बातमीव्दार तसेच तांत्रिक विश्लेषणावरुन पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, महेश बारवकर, सागर बोरगे, अभिनय चौधरी यांना नमुद आरोपी हा शंकर महाराज वसाहत, बालाजीनगर येथे असल्याची खात्रीलायक बातमी मिळाल्याने लागलीच तपास पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन आरोपीताचा शोध घेतला तो मिळुन आल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक केली आहे.

आरोपीकडे केले तपासामध्ये त्याचेकडुन खालील प्रमाणे घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

१.भारती विद्यापीठ पो.स्टेशन गु.र.नं.९०४/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३३१(३),३०५ (अ)
२.भारती विद्यापीठ पो.स्टेशन गु.र.नं.९९३/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३३१(३),३०५(अ)

सदरची कामगिर मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परि-२ श्रीमती स्मार्तना पाटील , मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्री.राहुल आवारे, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संगीता देवकाते, राहुलकुमार खिलारे, व तपास पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, महेश बारवकर, सागर बोरगे, अभिनय चौधरी, चेतन गोरे, मंगेश पवार, निलेश खैरमोडे सचिन गाडे, सचिन सरपाले यांच्या पथकाने केली आहे.